# FAQ

**१. निराश्रित महिला/पुरुष साहाय्यकारीकोष, वृद्धाश्रम फंडातून आर्थिक मदत हवी असल्यास निकष कोणते?**

उत्तर: निराश्रित महिला/पुरुष साहाय्यकारी कोष, वृद्धाश्रम फंडातून आर्थिक मदतीचे छापील अर्ज सभेच्या संकेतस्थळावर तसेच सभेच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. संपूर्ण माहिती भरून ते अर्ज संकेतस्थळावर अपलोड करू शकता अथवा संस्थेच्या कार्यालयात जमा करू शकता. अर्जासोबत उत्पन्नाचा दाखला, वय, जन्मतारीख, संपूर्ण नाव, पत्ता, आजार असल्यास त्याबाबतचा तपशील, डॉक्टरांचा दाखला, बँकखात्याचा तपशील, औषधोपचाराची बीले (देयके) आदि कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

**२. मतिमंद कोष, रुग्णसेवा कोष, वैद्यकीय कोष, कर्करोग फंड, वृद्धाश्रम फंड आदि फंडांतून आर्थिक मदत हवी असल्यास त्याबाबत निकष कोणते?**

उत्तर: मतिमंद कोष, रुग्णसेवा कोष, वैद्यकीय कोष, कर्करोग फंड, वृद्धाश्रम फंड यासंदर्भात छापील अर्ज सभेच्या संकेतस्थळावर तसेच संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. अर्जासोबत उत्पन्नाचा दाखला, अर्जदाराचे संपूर्ण नाव व पत्ता, वय, जन्मतारीख, आजाराचा तपशील, डॉक्टरांचा दाखला, उपचारांवर होणारा वार्षिक खर्च, औषधोपचारांची बीले (देयके), बँकखात्याचा तपशील, उत्पन्नाचा दाखला आदि कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. संपूर्ण माहितीसह अर्ज भरून पाठवणे.

**३. विद्यार्थी/विद्यार्थिनी विद्यावृद्धी कोष फंडांमधून आर्थिक मदत हवी असल्यास निकष कोणते?**

उत्तर: शिष्यवृत्तीचे छापील अर्ज सभेच्या संकेतस्थळावर तसेच संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. अर्जासोबत उत्पन्नाचा दाखला, शाळा/कॉलेजचा दाखला, वार्षिक उत्पन्नाचा दाखला, प्रगती पत्रक, बँक खात्याचा तपशील आदि कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. संपूर्ण माहितीसह अर्ज भरून पाठवणे.

**४. माझ्या मुलीचे शिक्षण पूर्ण झाले असून तिचे लग्न ठरले आहे. आर्थिक परिस्थिती बेताची आहे. आपल्या कन्यादान फंडामधून मदत मिळवण्यासाठी काय करावे?**

उत्तर: कन्यादान फंडाचे छापील अर्ज सभेच्या संकेतस्थळावर तसेच संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. अर्जासोबत मुलीचे नाव, पत्ता, वय, जन्मतारीख, शिक्षण, लग्नासाठी अपेक्षित खर्च, उत्पन्नाचा दाखला, लग्नपत्रिका, बँक खात्याचा तपशील आदि कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. संपूर्ण माहितीसह अर्ज भरून पाठवणे.

**५. सभेतर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या 'वधू-वर-पालक मेळावा' याबद्दल माहिती मिळू शकेल का?**

उत्तर: सभेचा 'वधू-वर-पालक मेळावा' दरवर्षी २५ डिसेंबर रोजी आयोजित केला जातो. सभेच्या संकेतस्थळावर व कार्यालयात वधू-वर नोंदणी अर्ज उपलब्ध आहेत. सभेच्या संकेतस्थळावर अर्ज डाऊनलोड करून ती माहिती अपलोड करण्याची सोय आहे. सभेतर्फे नोंदणी शुल्क रु. २५०/- आकारले जाते. सभेच्या त्रैमासिकात त्याबाबतची माहिती एकदाच छापली जाते. अर्जाची वैधता (validity) एका वर्षाकरिता असते. अर्जासोबत वधू-वराचे नाव, संपूर्ण पत्ता, वय, जन्मतारीख, फोटो, उंची, वजन, शिक्षण, नोकरी/व्यवसाय, वार्षिक उत्पन्नाचा दाखला, गोत्र, कुलदैवत, पत्रिका, रक्तगट आदि माहिती असलेली कागदपत्रे जोडावीत.

**६. मला 'कुडाळदेशकर ऋग्वेदी यांची गोत्रप्रवर मालिका' हा दुर्मीळ ग्रंथ वाचावयास मिळेल का?**

उत्तर: आपणास हवा असलेला वरील दुर्मीळ ग्रंथ तसेच गौड ब्राह्मण ज्ञातीविषयीचे ग्रंथ संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. हे ग्रंथ कार्यालयात बसून वाचता येतील किंवा त्यांच्या नोट्स घेता येतील. मात्र येण्यापूर्वी कार्यालयाशी संपर्क साधणे.

**७. मला आपल्या ‘कुडाळदेशकर गौड ब्राह्मण प्रीमियर लीग क्रीडामहोत्सवात (KPL)’ सहभागी व्हायचे असेल तर काय करावे?**

उत्तर: ‘कुडाळदेशकर गौड ब्राह्मण प्रीमियर लीग (KPL) क्रीडामहोत्सवाचे आयोजन दरवर्षी जानेवारी महिन्यात केले जाते. त्याबाबतची माहिती गौड ब्राह्मण त्रैमासिकात छापली जाते. तसेच संकेतस्थळावर आणि संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध होते. यासाठी स्पर्धकाने गौड ब्राह्मण सभेचे सभासदत्व स्वीकारणे गरजेचे आहे.

इच्छुक खेळाडू/संघाने प्रतिवर्षी साधारणपणे सप्टेंबर-ऑक्टोबर मध्ये संस्थेच्या गिरगाव येथील कार्यालयाशी संपर्क साधावा.

**८. संस्थेच्या सामाजिक कार्यात हातभार म्हणून माझ्या आईवडिलांच्या तसेच नातेवाईकांच्या स्मरणार्थ देणगी देण्यासाठी आम्ही काय करू शकतो?**

उत्तर: सभेतर्फे कायमनिधी फंडांमधून ज्ञातीतील गरजूंसाठी विविध उपक्रम राबवले जातात. याबाबतची विस्तृत माहिती सभेच्या संकेतस्थळावर तसेच सभेच्या त्रैमासिकात नियमितपणे प्रसिद्ध केली जाते. देणगीचा तपशील व छापील अर्ज टपालाद्वारे आपल्या पत्त्यावरदेखील पाठवले जातात. यासंदर्भात अधिक माहितीसाठी सभेच्या संकेतस्थळावर किंवा कार्यालयात संपर्क साधावा.